शासकीय कर्मचाऱ्यांना निकडीच्या परिस्थितीत खाजगी उपचारासाठी केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती संदर्भात तसेच शासकीय रुग्णालयात अनुज्ञेय असलेल्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके सादर करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे --- एकत्रित आदेश

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमएजी.१०९९/ प्र.क्र.२४०/९९; आरोग्य-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० ऑगस्ट, १९९९

**शासन निर्णय :-**

शासकीय कर्मचारी / अधिकारी यांना अतिगंभीर २३ आजारासंदर्भात तसेच परदेशी वैद्यकीय सेवा घेण्यासंदर्भात व ५ गंभीर आजारासंदर्भात तसेच वैद्यकीय देखभाल नियम २(५) अन्वये निरनिराळया आजारांच्या करतां खाजगी रुग्णालयामध्ये औषधोपचार करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. ही देयके सादर करण्यासंदर्भात पुढील प्रमाणे पध्दत अनुसरण्यात यावी.

महाराष्ट्र राज्य सेवा वैद्यकीय देखभाल नियम १९६१ अन्वये शासकीय कर्मचारी / अधिकारी व त्यांचे कुटुंबियांना प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यांच्या सल्ल्यावरुन घेतलेल्या शासकीय रुग्णालयातील आंतररुग्ण तसेच बाहयरुग्ण म्हणून वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मागणी वरील नियमानुसार अनुज्ञेय ठरते. ज्या रुग्णालयामध्ये कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय आंतररुग्ण म्हणून दाखल झाले आहेत,त्या कर्मचाऱ्यांना आंतररुग्ण म्हणून रुग्णालयात असताना जो खर्च आला असेल त्याची प्रतिपूर्ती "ब" नमुन्यात देणे आवश्यक आहे.

काही वेळेला शासकीय कर्मचाऱ्याला शासकिय रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून दाखल व्हावे लागत नाही परंतु बाहयरुग्ण म्हणून उपचार घेवू शकतात. अशावेळी प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली औषधे, उपकरणे इत्यादीसाठी आलेला खर्च हा प्रतिपूर्ती नमूना "अ" मध्ये करणे आवश्यक आहे. या संदर्भात शासनाने १ मार्च १९९९ च्या आदेश क्रमांकः एमएजी-१०८४/११६/ सीआर/४१/९९/ आरोग्य-३ अन्वये काढलेले आदेश व त्याला जोडलेले नमुने "अ" व "ब" यात नमूद केलेली कार्यपध्दती अंमलात येतील. शासकीय कर्मचाऱ्यांना किंवा त्यांच्या कुटुंबियांनी जर निरनिराळ्या शासकीय रुग्णालयामध्ये औषधोपचार घेतले असतील तर त्याकरिता प्रमाणपत्र नमुने "अ" व "ब" हे स्वतंत्र देणे आवश्यक असेल.

शासनाने निरनिराळया आजारांबाबत निरनिराळया खाजगी रुग्णालयांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ चे नियम २(५) अन्वये मान्यता दिली आहे. सोबत आजार व मान्यता दिलेली रुग्णालये यांची यादी सोबत जोडली आहे. (परिशिष्ट "अ" चे भाग १,२ व ३) या आजारांकरीता खाजगी रुग्णालयात घेतलेल्या वैद्यकीय सेवांकरीता आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीची देयके "क" व "ड" नमुन्यात सादर करणे आवश्यक आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

जिल्हाधिकारी कार्यालय
7 OCT 1999
शाखा
प्रति. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

(एल.जी.इप्पेवार)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति.

शासन आदेश क्र. एमएजी १०९९/प्र.क्र.२४०/९९/आरोग्य-३ दिनांक ३० ऑगस्ट,१९९९ चे

परिशिष्ठ - अ

भाग -१

खाली नमूद केलेले २३ आजारांस तसेच ५ गंभीर आजारांचे संदर्भात या आदेशाद्वारे आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात औषधोपचार घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) हृदयविकाराचा झटका (Caediac emergency ) प्रमस्तिष्क संवहनी (Cerbal Vascular ) फुफ्फुसाच्या विकाराचा झटका (Pulmonary emergency)
२) अतिरक्तदाब (Hypertention)
३) धनुर्वात (Tetanus)
४) घटसर्प (Diptheria)
५) अपघात (Accisent) आघात संलक्षण (Shock Syndrome) हृदयाशी आणि रक्तवाहिनीशी संबंधीत (Cardiological and Vascular)
६) गर्भपात (Abortions)
७) तीव्र उदर वेदना / आंत्र अवरोध (Acute abdominal pains/Intestinal obstrucion)
८) जोरदार रक्तस्त्राव (Severe haemerrage)
९) गॅस्ट्रो - एन्ट्रायटिस (Gastro- Enteritis)
१०) विषमज्वर ( Typhoid)
११) निश्चेतनावस्था (Coma)
१२) मनोविकृतीची सुरुवात ( Onset of Psychiatric disorder)
१३) डोळयातील दृष्टीपटल सरकणे (Retinal detachment in the eye)
१४) स्त्रीरोगशास्त्र आणि प्रसूतीशास्त्र संबंधित यांच्याशी आकस्मिक आजार ('Gynaecological and obstetric emergancy)'
१५) जनन-मूत्र आकस्मिक आजार (Genito-urinary emergency)
१६) वायु कोथ (Gas Gangrine)
१७) कान, नाक किंवा घसा यांमध्ये विजातीय पदार्थ गेल्यामुळे निर्माण झालेले आकस्मिक आजार (Foreign body in ear, Nose or Troat Emergency)
१८) ज्यामध्ये तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते अशा जन्मजात असंगती. ( Cogenital Anamolies reguiring urgent surgical intervention)
१९) एड्स ( AIDS)
२०) ब्रेन ट्युमर ( BRAIN TUMOUR)
२१) भाजणे ( BURNS)
२२) इपिलेप्सी ( Epilepsy)
२३) ॲक्युट ग्लॅकोमा ( Acute Glaucoma)

गंभीर आजार - भाग - २

१) हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे (Heart Surgery)
२) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया (Bye pass Caronary Surgery)
३) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया
४) मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया (Kidney Transplantation)
५) रक्ताचा कर्करोग (Blood Cancer)

भाग - ३

**महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम ६१ खालील नियम २(५) अन्वये विशिष्ट आजाराबाबत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या संस्थांना शासन मान्यता देण्यात आली आहे. तेथे घेतलेल्या सेवेकरीता आलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकीय कर्मचारी / अधिकारी यांना देय आहे.**

| अ.क्र. | आजाराचे नांव | | प्राधिकृत संस्थेचे नांव |
|---|---|---|---|
| १ | लहान मुलांचे आजार | | बाई जेरबाई वाडीया रुग्णालय, मुंबई |
| २ | कर्करोग | १ | टाटा मेमोरीयल रुग्णालय, मुंबई |
| | | २ | बालाभाई नानावटी रुग्णालय, मुंबई |
| | | ३ | कॅन्सर रिलीफ सोसायटी, नागपूर |
| | | ४ | अश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च ॲण्ड रिलीफ सिोसायटी, बार्शी |
| | | ५ | श्री सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सोसायटी, सोलापूर |
| | | ६ | इंडियन कॅन्सर सोसायटीच्या महाराष्ट्रातील सर्व संस्था |
| | | ७ | कॅन्सर इनिस्टटयुट,अडयार, मद्रास |
| | | ८ | संत तुकाराम मेडीकल रिसर्च सेंटर, महर्षी दयानंद मार्ग, अकोला |
| ३ | ऑर्थोपेडिक उपचार | १ | ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, महालक्ष्मी, मुंबई |
| | | २ | ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ फिजीकल मेडीसीन ॲण्ड रिहॅबिलिटेशन, महालक्ष्मी, मुंबई |
| ४ | मधुमेह | | रहेजा रुग्णालय, मुंबई |
| ५ | मणक्याचे विकार, खुब्याचे विकार, वेदनायुक्त सांध्याचे विकार व ते बदलण्याची शस्त्रक्रिया, दुर्बिणीद्वारे गुडघ्याच्या विकाराचे निदान व उपचार | १ | संचेती इन्स्टिटयुट फॉर ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन, पुणे |
| | | २ | स्वास्थीयोग प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्ट फॅक्चर ॲण्ड ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, मिरज |
| | | ३ | सुश्रुत मेडीकल केअर ॲण्ड रिसर्च सोसायटीचे हर्डीकर हॉस्पिटल, पुणे |
| ६ | कॉम्प्युटराईज्ड रेस्टींग इलेक्ट्रो कॉर्डिओग्राम | | डॉ.शशांक सुभेदार नॅशनल हार्ट सेंटर ॲण्ड क्लिनिक, नागपूर ( या रुग्णालयास निरनिराळया चाचण्यांच्या संदर्भात मान्यता दिलेली आहे. |
| | कॉम्प्युटराईज्ड ट्रेडमील स्ट्रेस टेस्ट | | |
| | व्हेक्टीरोकार डायग्राम | | |
| | कलर डॉपलर एको कार्डीओग्राफी | | |
| | परमनन्ट पेसमेकर ॲनालायसेस | | |
| | ॲम्बुलेटरी व्होल्टर मॉनिटरींग | | |
| ७ | पोलिओ अस्थिव्यंगोपचार | | ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ फिजीकल मेडिसीन ॲण्ड रिहॅबिलीटेशन, महालक्ष्मी, मुंबई |

-------